# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

---

**दिनांक २७.०९.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २६.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये १२ केसेसमध्ये १२ ईसमावर कारवाई करून एकुण १६,०६०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०२ केसेसमध्ये ०७ इसमांवर कारवाई करून एकुण ९१,२७५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दिनांक २५.०९.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २६.०९.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०२ इसमावर कारवाई करण्यात आलेली आहे.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ३० केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये २४ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये ०७ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये ९५ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ५३ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये १६ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ३९ केसेस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये ०१ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४बी(१) मोवाका अन्वये ०६ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये ३६९ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे ०४ केस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण ६५६ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. १,६५,५००/—रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) धंतोली पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक २७.०९.२०२६ चे ०३.२० वा. ते ०४.४५ वा. चे दरम्यान, धंतोली पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना पंचशिल चौक बस स्टॉपसमोर एक हिरो होंडा सिडी डिलक्स व ॲक्टीवा मोपेड वरील दोन दुचाकीस्वार ईसमांवर संशय आल्याने त्या दोघांनाही थांबवुन, त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी आपले नाव १) कुणाल कवडुजी प्रधान, वय २६ वर्षे, रा. संजय नगर, पांढराबोडी, अंबाझरी, नागपुर २) मित गणेश कार्की, वय २१ वर्षे, रा. मानकर ले—आऊट, लाव्हा, दत्तवाडी रोड, वाडी, नागपुर असे सांगीतले. त्यांचे जवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, एनडीपिएस कायद्याचे तंतोतंत पालन करून, पंचासमक्ष त्यांची अंगझडती घेतली असता, त्यांचे ताब्यात दोन झिपलॉक पन्नीमध्ये १३.५ ग्रॅम एम. डी. पावडर मिळुन आली. आरोपींचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०२ मोबाईल फोन, हिरो होंडा सिडी डिलक्स क्र. एम. एच. ३१ सि.डी १९३८ व ॲक्टीवा मोपेड क्र. एम.एच ३१ एफ.एच २२१७ असा एकुण १,५०,५००/—

रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्रीकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपीचे कृत्य हे कलम ८(क), २२(ब), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे धंतोली येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नागरे पाटील पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग पोलीस उप आयुक्त (परि. क्र. २), मा. श्रीमती सुनिलसिंग पवार सहा. पोलीस आयुक्त (सिताबर्डी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. साईनाथ रामोड, पोउपनि. शुभम बकाल, पोहवा. अमोल लोणकर, योगेश चांभारे, पोअं. भुवनेश्वर मोहड, प्रदीप श्रीरामे, प्रितम मोरे व विक्की बोरे यांनी केली.

**३) गुन्हेशाखा युनिट क्र. ४ पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास घातक शस्त्रासह अटक.**

दिनांक २६.०९.२०२६ चे १५.४५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. ४ पोलीसांचे तपास पथक हे पेट्रोलींग करीत असता, पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत सिंधीबन मैदानाचे भिंतीलगत एक इसम संशयीतरित्या फिरतांना दिसुन आल्याने, त्याचेजवळ जात असतांना, तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्याचा पाठलाग करून, त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव सुशिल उर्फ कोमा उत्तम वाघमारे, वय २० वर्षे, रा. भांडेप्लॉट, सेवादल नगर, चाटे कोचिंग क्लासेस मागे, सक्करदरा, नागपूर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आत कंबरेत एक लोखंडी फोल्डींगचा चाकु किंमती ५००/—रू. चा मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपीला पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०४ यांचे हद्दपार आदेश क्र. ०८/२०२५, दिनांक २८.०७.२०२५ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत घातक शस्त्रासह दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे सक्करदरा येथे आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १४२, १३५ म.पो.का., अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीस पुढील कार्यवाहीस्तव सक्करदरा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नागरे पाटील पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. बाबुराव राऊत, सपोनि. वैभव बारंगे, पोहवा. अभिषेक शनिवारे, अजय यादव, प्रकाश राजपल्लीवार व नरेंद्र बांते यांनी केली.



**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे जरीपटका :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १८.०९.२०२६ चे १९.३० वा. चे सुमारास, फिर्यादी डॉ. सौ. स्नेहा खोब्रागडे, वय ४० वर्षे, रा. आनंद नगर, सिताबर्डी, नागपुर ह्या त्यांची मोठी आई नामे श्रीमती इंदुमती मदन खोब्रागडे, वय ६५ वर्षे, रा. प्लॉट नं. ११५, कपील नगर गार्डन समोर, नागपुर यांचेसह पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत, भिमचौक ते पाटणकर चौक दरम्यान, मेडप्लस फार्मसी समोरून, पायदळ रस्ता ओलांडीत असतांना, एका अज्ञात दुचाकी वाहनाचे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन पायी जाणाऱ्या फिर्यादीचे मोठे आईस धडक देवुन, पळुन गेला. फिर्यादीची मोठी आई खाली पडलयाने त्यांचे डोक्याला मार लागुन त्या गंभीर जखमी झाल्या. त्यांना उपचाराकरीता न्युरॉन हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान दिनांक २६.०९.२०२६ चे १६.३० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे पोउपनि. चंद्रशेखर गभणे ९७६५३९४१८५ यांनी अज्ञात दुचाकी चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१), २८१ भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे मानकापुर :—** दिनांक २६.०९.२०२६ चे ०८.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे मानकापुर हद्दीत, कल्पना टॉकीज चौक, एनएटिडी ऑफीस ते बसस्टॉप दरम्यान, एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ४५ ते ५० वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकाचे वर्णन, रंग सावळा, चेहरा लांबट, बांधा सडपातळ, उंची ५ फुट ५ इंच, अंगात आकाशी टि—शर्ट ज्यावर नाईकी लिहीलेले, आतमध्ये पांढरे बनियान घातलेले होते. मृतक ईसम परिसरात भिक्षा मागुन उदरनिर्वाह करीत असल्याचे फिर्यादी यांनी सांगीतले. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे मानकापुर येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी सरतर्फे शुभम शिवचरण शाहु, वय ३० वर्षे, रा. मानकापुर पोस्ट ऑफीस जवळ, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे मानकापुर येथे सफौ. वासुदेव नारखेडे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद घेतली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे धंतोली :—** दिनांक २४.०९.२०२६ चे ०७.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे धंतोली हद्दीत गजानन नगर, प्लॉट नं. ६४, माधव नेत्रालय जवळ, नागपुर येथील एका बांधकाम साईडचे ६ वे माळ्यावर, मजुर काम करणारे ईसम नामे शिवकुमार शिलचंद्र विश्वकर्मा, वय ३५ वर्षे, रा. ग्राम छुई, तह. केवलारी, जि. शिवनी (मध्य प्रदेश), ह.मु.— घटनास्थळी हे प्लास्टरचे काम करीत असतांना त्यांचा अचानक तोल जावुन, ते जमिनीवर खाली पडल्याने गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता न्यु ईरा व तेथुन एम्स हॉस्पीटल येथे दाखल केले होते, उपचारादरम्यान दिनांक २५.०९.२०२६ चे १५.१५ वा. डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे धंतोली येथे पोउपनि. किरण महामुनी यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**

**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**